पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १४

**सभावृत्तांत**

दिनांक - **०७/११/२०१७** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०७/११/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.सुनिता हेमंत तापकीर - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे - उपसभापती
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
५. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
६. मा.लोखंडे चंदा राजू
७. मा.कदम निकीता अर्जुन
८. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.आष्टीकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पवनाथडी जत्रेचे नियोजन पी.डब्लू.डी.ग्राऊंड सांगवी येथे करण्याबाबत – मा.सागर आंगोळकर, मा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत अस्तित्व पुनर्वसन योजनेतील वयाची अट शिथील करणेबाबत – मा.योगिता नागरगोजे, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **१७/१०/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १३ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - १९ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०७/११/२०१७

सुचक : मा.सागर आंगोळकर अनुमोदक : मा.सोनाली गव्हाणे

संदर्भ : मा.सागर आंगोळकर, मा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव –

सदर वर्ष २०१७-१८ या कालावधीत महानगरपालिकेच्या नागरवस्ती विभागाच्या अंतर्गत केल्याजाणा-या पवनाथडी जत्रेचे नियोजन यावर्षी पी.डब्लू.डी.ग्राऊंड, सांगवी येथे करण्यास तसेच याकामी येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २० विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०७/११/२०१७

सुचक : मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ : मा.योगिता नागरगोजे, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव –

नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी, सबलीकरणासाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. यामध्ये महिला बालकल्याण योजने अंतर्गत अस्तित्व पुनर्वसन योजना कार्यान्वीत असून या योजनेअंतर्गत २१ वर्षाखालील अल्पवयीन पिडीत अत्याचारीत मुलीला तिच्या पुनर्वसनासाठी दरमहा र.रु.१,०००/- या प्रमाणे अर्थसहाय्य १ वर्षापर्यंत देण्यात येते. परंतु या योजनेत वयाची अट असल्याने २१ वर्षावरील पिडीत / अत्याचारीत मुली / महिला या योजनेच्या लाभापासून वंचीत राहतात. त्यामुळे या योजनेसाठी कोणतीही वयाची अट ठेवणे उचित वाटत नसल्याने या योजनेतील वयाची अट रद्द करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुनिता हेमंत तापकीर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२३९/२०१७
दिनांक : ०७/११/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.